**राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा,**
**ता.वडसा(देसाईगंज)जि.गडचिरोली**
**सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०१९-२०**
**सामान्य क्षमता चाचणी पेपर क्र.१**
**दिनांक-२६/०६/२०२२**

आवेदन अर्ज (बैठक) क्रमांक

| एकुण गुण : १०० | संच D | वेळ ९० मिनिटे |
|---|---|---|

**सुचना :-**

१. लेखी परीक्षा १०० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची आहे. प्रत्येक बरोबर उत्तरास प्रत्येकी एक गुण देण्यात येईल.
२. वस्तुनिष्ठ उत्तरत्रिका संचानुसार तपासण्यात येत असल्याने प्रश्नांचे उत्तर अ), ब), क), व ड) या पर्यायामधुन योग्य पर्याय निवडुन फक्त योग्य पर्यायाचा गोल काळ्या शाईच्या बॉलपेनने उत्तरपत्रिकेत स्पष्ट व पुर्णपणे भरण्यात यावा.
३. प्रश्नपत्रिकेवर / उत्तरपत्रिकेवर कसल्याही प्रकारची खाडाखोड करण्यात येऊ नये. प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर खालील बाजूस कच्चे काम करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.
४. प्रवेशपत्रात दिलेल्या सुचनांचे पालन न केल्यास उमेदवारांना परीक्षेतुन बाहेर करण्यात येईल व त्यास अपात्र टरविण्यात येईल.

| अ.क्र. | प्रश्न व पर्याय | अ.क्र. | प्रश्न व पर्याय |
|---|---|---|---|
| 1 | **मेळघाट, ताडोबा अभयारण्य अनुक्रमे कोणत्या जिल्ह्यामध्ये आहे ?**<br>अ अमरावती, चंद्रपूर   ब यवतमाळ, भंडारा<br>क गडचिरोली, नांदेड   ड गोंदिया, अमरावती | 2 | **तीन राजधानी असलेले देशातील पहीले राज्य कोणते ?**<br>अ आंध्रप्रदेश   ब महाराष्ट्र<br>क दिल्ली   ड आसाम |
| 3 | **भारतामध्ये नोटबंदी केव्हा झाली?**<br>अ 10 नोव्हेंबर 2016   ब 9 नोव्हेंबर 2016<br>क 8 नोव्हेंबर 2016   ड 10 नोव्हेंबर 2017 | 4 | **एलोन मस्क हे नाव कोणत्या कंपनीशी संबंधित आहे?**<br>अ सिरम   ब टेस्ला<br>क इन्फोसिस   ड टोयोटा |
| 5 | **असा कोणता प्राणी आहे जो एकाच वेळेला दोन वेगवेगळ्या दिशेला बघू शकतो ?**<br>अ. राणा टायग्रिना बेडूक   ब. शॅमेलिऑन सरडा<br>क घोणस साप   ड. सॅलॅमँडर | 6 | **पोलिओ रोग शरीराच्या कोणत्या भागात इजा करतो?**<br>अ हाड   ब डोळा<br>क मज्जासंस्था   ड मान |
| 7 | **वातावरणामध्ये कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण किती टक्के आहे?**<br>अ. 3%   ब. 0.04%   क. 7%   ड. 22% | 8 | **कोणत्या रोगाचा प्रसार पाण्यामार्फत होत नाही?**<br>अ कॉलरा   ब टायफॉईड<br>क. काविळ   ड स्वाईन फ्लू |
| 9 | **पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करण्यासाठी खालीलपैकी काय वापरतात ?**<br>अ सोडा   ब तुरटी<br>क क्लोरीन   ड यापैकी काही नाही | 10 | **बीसीजी लस खालील कोणत्या रोगापासून बचाव करते-**<br>अ रातांधळेपणा   ब क्षयरोग<br>क कुष्ठ रोग   ड कोवीड |
| 11 | **मानवी छातीच्या पिंजऱ्यात एकूण बरगड्यांची संख्या किती आहे ?**<br>अ 24   ब. 36   क 21   ड 30 | 12 | **रक्त गोठण्यासाठी कोणत्या जीवनसत्वाचा उपयोग होतो ?**<br>अ बी   ब ए   क के   ड डी |
| 13 | **खालीलपैकी कोणता असंसर्गजन्य रोग आहे?**<br>अ क्षयरोग   ब मधुमेह<br>क घटसर्प   ड गोवर | 14 | **नॅशनल मॅथमॅटिक्स डे कधी साजरा केला जातो?**<br>अ 14 मार्च   ब 10 जुलै<br>क 22 डिसेंबर   ड 20 ऑक्टोबर |
| 15 | **एड्स चा विषाणु शरीरातील कोणत्या घटकावर परिणाम करतात?**<br>अ श्वसन संस्था   ब चेतापेशी<br>क श्वेत पेशी   ड अस्थिमज्जा | 16 | **तंबाखू मध्ये कोणता हानिकारक पदार्थ आहे?**<br>अ निकोटीन   ब कॅफीन<br>क ॲडनिन   ड टॅनिन |
| 17 | **C-60 हा शब्दप्रयोग गडचिरोली जिल्ह्यातील कशासाठी वापरला जातो?**<br>अ बालमृत्यू दर रोखणे<br>ब बालविवाह रोखणे<br>क नक्षलवादी कारवाया रोखणे<br>ड आदिवासींसाठी रोजगार निर्मिती करणे | 18 | **गडचिरोली जिल्ह्यामध्ये खालीलपैकी कोणता तालुका आहे ?**<br>अ उमरेड   ब ब्रह्मपुरी<br>क भिवापूर   ड चामोर्शी |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | पी. व्ही. सिंधू ही कोणत्या खेळाशी संबंधित आहे?<br>अ टेबल टेनिस ब बॅडमिंटन<br>क हॉकी ड लॉन टेनिस | 20 | उत्तराखंड या राज्याची राजधानी कोणती आहे?<br>अ मसूरी ब मनाली<br>क डेहराडून ड चंदिगड |
| 21 | बल्लारपूर कागद कारखाना कोणत्या जिल्ह्यात आहे?<br>अ गडचिरोली ब चंद्रपूर<br>क नागपूर ड गोंदिया | 22 | 'मा यो गी श्री न' या अक्षरांपासून बनणारा अर्थपूर्ण शब्द तयार केला असता त्याचे मधले अक्षर काय असेल ?<br>अ गी ब न क मा ड यो |
| 23 | गटात न बसणारी संख्या कोणती?<br>अ 63 ब 26<br>क 124 ड 217 | 24 | गटात न बसणारे इसवीसन कोणते ?<br>अ इ.स. 1900 ब इ.स. 1984<br>क इ.स. 2004 ड इ.स. 2011 |
| 25 | मोटार : घसर गाडी तर विजेचा दिवा : ?<br>अ बल्ब ब पणती<br>क ट्यूब ड सूर्य | 26 | सुवाहक : तांबे तर दुर्वाहक : ?<br>अ कथील ब चांदी<br>क ॲल्युमिनियम ड काच |
| 27 | क्रमाने येणारी संख्या ओळखा<br>2, 6 ,18, 54,162.......<br>अ 636 ब 386 क 586 ड 486 | 28 | एका रांगेतील मधल्या मुलाचा क्रमांक सतरा आहे तर त्या रांगेत एकूण किती मुले आहेत?<br>अ 33 ब 34 क 32 ड 35 |
| 29 | आज वडिलांचे वय मुलाच्या वयाच्या पाच पट आहे. पाच वर्षांनी त्यांच्या वयाचे गुणोत्तर 10:3 होईल तर मुलाचे आजचे वय किती?<br>अ 7 ब 12 क 15 ड 5 | 30 | राजू, संजू व विजू यांच्या वयाची सरासरी 16 वर्ष आहे. राजू व संजू यांच्या वयाची सरासरी 14 वर्ष आहे तर विजू चे वय किती?<br>अ 20 ब 16 क 24 ड 18 |
| 31 | सविता चा सहावा वाढदिवस 17 मे 2004 रोजी सोमवारी झाला तर तिचा जन्म कोणत्या वारी झाला?<br>अ शनिवार ब रविवार<br>क सोमवार ड मंगळवार | 32 | 03:37 वाजता घड्याळ्यांची आरशातील प्रतिमा कोणती वेळ दर्शविते ?<br>अ 08:23 ब 08:13<br>क 09:13 ड 09:23 |
| 33 | तीस दिवसांच्या एका महिन्यात पाच शनिवार आहेत त्या महिन्याचा प्रथम दिवस कोणता असेल ?<br>अ रविवार ब सोमवार<br>क बुधवार ड शुक्रवार | 34 | संख्या श्रेणी मध्ये चुकीची संख्या ओळखा .<br>3,7, 16 ,32, 56 ,93 ,142<br>अ 7 ब 16<br>क 56 ड 32 |
| 35 | समाज सेवक या शब्दातील खालीलपैकी कोणता शब्द तयार होत नाही.<br>अ नमाज ब समाज क सेवक ड कस | 36 | गटात न बसणारे पद निवडा<br>अ ग्रॅम ब मिनिट<br>क मीटर ड लिटर |
| 37 | गटात न बसणारे पद निवडा<br>अ भारत ब चीन क इराण ड जर्मनी | 38 | गटात न बसणारी संख्या निवडा<br>अ 276 ब 184 क 69 ड 232 |
| 39 | गटात न बसणारी संख्या शोधा<br>अ 56/98 ब 96/120 क 92/161 ड 60/105 | 40 | पोपट : पिंजरा :: माणूस : ?<br>अ घर ब जंगल<br>क तुरुंग ड शहर |
| 41 | आयत : दंडगोल :: त्रिकोण : ?<br>अ घनाकृती ब शंकू<br>क समभुज त्रिकोण ड गोल | 42 | पहिल्या दोन संख्यांचा संबंध लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी येणारी संख्या शोधा<br>6 : 15 :: ? : 18<br>अ 7 ब 8 क 9 ड 10 |
| 43 | क्रमाने येणारी संख्या ओळखा 2 , 5 , 11 , 23 , ?<br>अ 54 ब 64 क 71 ड 72 | 44 | प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी येणारी संख्या शोधा<br>1, 9, 25, 49, ?, 121<br>अ 64 ब 81 क 100 ड 92 |
| 45 | एका पंख्याची छापील किंमत 2500 रुपये आहे. दुकानदाराने शेकडा बारा रुपये सूट दिली, तर किती रुपयात पंखा विकला?<br>अ 2100, ब 2200,<br>क 2250, ड 2488 | 46 | एका चौरसाचे क्षेत्रफळ 1225 चौरस सेंटीमीटर असल्यास त्याच्या बाजूची लांबी किती?<br>अ 45 मी. ब 25 सेंमी.<br>क 35 मी. ड 35 सेंमी. |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 47 | बेरीज करा . 2a+6b+8c आणि 16a+13c+18b<br>अ 18a+19c+26b  ब 18a+18c+26b<br>क 18a+21c +24b  ड 18a+19c+24b | 48 | $3y^2$-10y+16 व 2y -7 यांची बेरीज करा<br>अ $3y^2$-8y+9  ब $3y^2$+12y+23<br>क $5y^2$-10y+23  ड $3y^2$ +12y+9 |
| 49 | पहिल्या राशीतून दुसरी राशी वजा करा<br>(4xy-9z), (3xy -16z)<br>अ 7xy – 25z  ब xy + z<br>क xy+7z  ड xy – 7z | 50 | 3x X 12y = ?<br>अ 36xy  ब 4 xy<br>क 4x  ड 36y |
| 51 | $(-3x^2)$ X (-4xy) = ?<br>अ 12 $x^3$  ब +$12x^3y$<br>क -$12x^3y$  ड $12x^2y$ | 52 | एका आयताची लांबी दुप्पट केली तर क्षेत्रफळात कितीने फरक पडेल?<br>अ दुप्पट होईल,  ब निमपट होईल,<br>क तेवढेच राहील,  ड दीडपट होईल |
| 53 | समीकरण सोडवा. m – 5 = 4 तर m= ?<br>अ 20  ब 9  क +1  ड -1 | 54 | 4x+ ½= 9/2 तर x = ?<br>अ 1  ब 5/2  क 10  ड 0 |
| 55 | (3x -11y) – (17x +13y ) = ?<br>अ 7x – 12y  ब -14x -54y<br>क -3(5x +4y )  ड -2(7x+12y) | 56 | राकेश चे वय सानियाच्या वयापेक्षा 5 वर्षांनी कमी आहे. त्यांच्या वयाची बेरीज 27 वर्षे आहे, तर प्रत्येकाचे वय किती ?<br>अ 16,11  ब 17, 10<br>क 12, 15  ड 22, 5 |
| 57 | 4(x+12) = 8 तर x= ?<br>अ +10.  ब -10.<br>क 24.  ड 96. | 58 | पुढील पैकी कोणत्या पदावलींची किंमत 37 आहे?<br>अ 10 X 3 + (5+2)  ब 10 X 4 + (5-3)<br>क 8 X 4 +3  ड (9 X 3) +2 |
| 59 | 7 किलो ग्रॅम कांदे 140 रुपयांना तर 12 किलो ग्रॅम कांदे किती रुपयांना मिळतील?<br>अ 84  ब 144  क 280  ड 240 | 60 | 4200 रु. मुद्दलाची द.सा.द.शे. 7 या दराने 3 वर्षांनी किती रास होईल?<br>अ 5082  ब 882.  क 5820.  ड 8280. |
| 61 | (50+ 1) (50-1) = किती?<br>अ 2501  ब 2402  क 2502  ड 2499. | 62 | 4/5 मध्ये किती मिळवल्यास 5/4 येईल ?<br>अ 9/20,  ब 9/9,  क 4/5,  ड 5/4 |
| 63 | रफिक व महेश यांनी प्रत्येकी 40000 व 60000 रु. गुंतवले व व्यवसाय चालू केला त्यांना 30% नफा झाला तर प्रत्येकाला किती नफा मिळाला?<br>अ 12000 व 18000  ब 1200 व 1800<br>क 30,000 व 10,000  ड 15000 व 15000 | 64 | एका वर्तुळाचा परीघ 176 से.मी. तर त्यांची त्रिज्या किती ?<br>अ 28 सेमी  ब 56 सेमी<br>क 14 सेमी  ड 7 सेमी |
| 65 | रिया, सिया व सायलीने 30 रु . 70 रु. व 50 रु. दिले. मी त्यात 150 रु. घातले. कागद आणून भेटकार्ड बनविले व विकून 600 रु. मिळविले. तर आम्हाला एकूण नफा किती झाला?<br>अ 600 रु.  ब 300 रु.  क 450 रु.  ड 100 रु. | 66 | 600 रु. मध्ये 15 पेंढ्या कडबा मिळतो तर1280 रुपयांमध्ये किती पेंढ्या कडबा मिळेल?<br>अ 32 पेंढ्या  ब 86 पेंढ्या<br>क 40 पेंढ्या  ड 55 पेंढ्या |
| 67 | सोडवा (-96) ÷16<br>अ +6  ब –6<br>क +8  ड -8 | 68 | प्रतल निश्चित करण्यासाठी कमीत कमी किती बिंदूंची आवश्यकता असते ?<br>अ एक,  ब दोन,  क तीन,  ड असंख्य. |
| 69 | (+8) - (-3) = किती ?<br>अ 11  ब -11  क 5  ड -5 | 70 | -1000 चे घनमुळ किती ?<br>अ 100,  ब 1000  क -10  ड 10 |
| 71 | एका रकमेचे द.सा.द.शे 12.5 दराने किती वर्षात दाम दुप्पट होईल ?<br>अ आठ वर्ष,  ब दहा वर्ष,<br>क साडेआठ वर्ष,  ड पाच वर्ष, | 72 | पोंगल हा कोणत्या राज्यातला उत्सव आहे?<br>अ केरळ  ब आंध्र प्रदेश<br>क तमिळनाडू  ड कर्नाटक |
| 73 | 'उंबराचे फूल' याचा अर्थ काय ?<br>अ दुर्मिळ गोष्ट  ब शेवटास जाणे<br>क सुंदर व्यक्ती  ड अभिमानी व्यक्ती | 74 | 'रामलक्ष्मण' या शब्दाचा समास कोणता ?<br>अ अव्ययीभाव  ब तत्पुरुष<br>क द्वंद्व  ड बहुव्रीही |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 75 | 'क्रीडांगण' या शब्दाचा समास कोणता ?<br>अ अव्ययीभाव ब तत्पुरुष<br>क द्वंद्व ड बहुव्रीही | 76 | हे द्विगु समासाचे उदाहरण आहे-<br>अ कमलनयन ब कांदेपोहे<br>क नवरात्र ड पहारेकरी |
| 77 | खालीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा<br>अ नागपुर ब एखादा<br>क हळूहळू ड कोणता | 78 | 'निष्कांचन' यास विरुद्धार्थी शब्द कोणता?<br>अ दरिद्री ब गरीब<br>क धनवान ड दुर्मीळ |
| 79 | 'पिपासा' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?<br>अ तृष्णा ब तहान<br>क भूक ड तृप्ती | 80 | 'धनको' या शब्दाचा अर्थ-<br>अ पैसे कर्जाने देणारा ब पैसे कर्जाने घेणारा<br>क धनसंचय करणारा ड धनवान |
| 81 | 'आफळा साफळ करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ<br>अ रागाने आदळ आपट करणे<br>ब अवसान आणणे<br>क घराची साफसूफ कारणे<br>ड बाजारहाट करणे | 82 | 'पोबारा करणे' या वाक्प्रचाराला समानार्थी वाक्प्रचार हा आहे -<br>अ वर्ज्य करणे ब सूंबाल्या करणे<br>क पायमल्ली करणे ड यापैकी नाही |
| 83 | 'अनुमोदन' या करीता कोणता समानार्थी शब्द नाही ?<br>अ होकार ब समर्थन<br>क पाठींबा ड आस्वाद | 84 | 'अभिलाषा' या करीता कोणता समानार्थी शब्द नाही ?<br>अ इच्छा ब हेतू<br>क लोभ ड गोडी |
| 85 | 'द्वीपकल्प' या शब्दाचा अर्थ काय?<br>अ . दोन्ही बाजूनी पाणी असलेला प्रदेश<br>ब . तिन्ही बाजूनी पाणी असलेला प्रदेश<br>क. दोन नद्यांमधील प्रदेश<br>ड. तिन्ही बाजूनी जमीन असलेला प्रदेश | 86 | 'दाम तसे काम' या अर्थाची म्हण शोधा<br>अ .जन्मा आला हेला, पाणी वाहत मेला<br>ब . डोंगर पोखरून उंदीर काढणे<br>क. जशी देणावळ तशी धुणावळ<br>ड . खाण तशी माती |
| 87 | 'कोल्हेकुई करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ -<br>अ खूप मोठ्याने ओरडणे<br>ब बडबड करणे<br>क व्यर्थ ओरड करणे<br>ड यापैकी नाही | 88 | 'राजाला मुकुट शोभतो' या वाक्यामध्ये 'मुकुट' हे काय आहे ?<br>अ कर्ता ब कर्म<br>क क्रियापद ड यापैकी नाही |
| 89 | 'हा' हे काय आहे ?<br>अ दर्शक सर्वनाम<br>ब प्रश्नार्थक सर्वनाम<br>क आत्मवाचक सर्वनाम<br>ड यापैकी नाही | 90 | 'भाड्याचा बैल ' या अलंकारिक शब्दाचा अर्थ काय आहे ?<br>अ खायला न देता कामाला जुंपलेला<br>ब ऐतखाऊ मनुष्य<br>क पुळचट मनुष्य<br>ड यापैकी नाही |
| 91 | 'घन' या शब्दाचा खालीलपैकी कोणता अर्थ होत नाही ?<br>अ हातोडा ब मेघ<br>क निबिड ड संकट | 92 | खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची कोणती जोडी चुकीची आहे ?<br>अ परवशता X स्वातंत्र्य ब प्रतारणा X सचोटी<br>क फुरसत X घाई ड पांगळा X अपंग |
| 93 | 'मी बाग पहिली' यात मी काय आहे?<br>अ नाम ब सर्वनाम<br>क क्रियापद ड विशेषण | 94 | 'सर्वांनी शांत बसा' या वाक्याचा प्रकार ओळखा<br>अ विध्यर्थी ब संकेतार्थी<br>क आज्ञार्थी ड संयुक्त |
| 95 | खालीलपैकी अनेकवचनी शब्द कोणता ?<br>अ रोपटे ब विहीर<br>क वेली ड झाड | 96 | 'राजेश घरातून बाहेर आला' यात घर या शब्दाची विभक्ती कोणती?<br>अ प्रथमा ब द्वितीया<br>क पंचमी ड चतुर्थी |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 97 | 'पतंग झाडावर अडकला' या वाक्यातील अव्ययाचा प्रकार ओळखा<br>अ. 'शब्दयोगी अव्यय<br>ब. उभयान्वयी अव्यय<br>क. क्रियाविशेषण अव्यय<br>ड. केवलप्रयोगी अव्यय | 98 | कन्हांडला व्याघ्र अभयारण्य कोणत्या जिल्ह्यात आहे ?<br>अ अमरावती ब भंडारा<br>क यवतमाळ ड नागपूर |
| 99 | सर्वात मोठा ग्रह कोणता ?<br>अ मंगळ ब गुरु<br>क पृथ्वी ड सूर्य | 100 | रातांधळेपणा कोणत्या जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे होतो?<br>अ बी ब ए<br>क सी ड डी |

समाप्त्

Scanned with CamScanner